**मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण ( म्हाडा ) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांच्यामार्फत उभारण्याकरीता मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्रमांक- एमयुएम-२०२२/प्र.क्र.३१७/नवि-१७**
**नगर विकास विभाग,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ सप्टेंबर,२०२३.

<u>वाचा</u> :- १) समक्रमांकाचा शासन आदेश दि.०२.१२.२०२२
२) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांचे पत्र दि.०४.०८.२०२३
३) प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांचे पत्र दि.२६.०८.२०२३

<u>प्रस्तावना :-</u>

मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) घरांच्या प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण ( म्हाडा ) द्वारे राबविण्याबाबत संदर्भाधीन शासन आदेशान्वये मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पाबाबत म्हाडाद्वारे दि.०२.०८.२०२३ च्या पत्रान्वये सदर प्रकल्प हाती घेण्याकरिता महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) इच्छूक असल्याने सदर प्रकल्प त्यांच्यामार्फत राबविण्यास ना-हरकत दिली असून आयुक्त भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांनीही या प्रस्तावास ना-हरकत दिली आहे.

या पार्श्वभूमीवर तसेच महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) दि.०४.०८.२०२३ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने. म्हाडा ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांच्यामार्फत उभारण्याकरीता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

१. मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) ६३४८ घरकुलांचा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) मार्फत राबविण्याकरिता मान्यता देण्याबाबत निर्गमित केलेला शासन आदेश दि.०२.१२.२०२२ अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२. प्रधानमंत्री आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेचा आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना घरकुले वाजवी किंमतीत मिळणे हा गाभा कायम ठेवून मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) ६३४८ घरकुलांचा प्रकल्प पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) महाप्रित व भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या आर्थिक हितसंबंधास बाधा येणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.

२) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या घरांच्या बांधकाम प्रकल्पास निकषानुसार व मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक मान्यता घेण्यात याव्यात.

३) या बांधकाम प्रकल्पातील ३० टक्के LIG घटकांसाठीचे बांधकाम व १० टक्के वाणिज्यिक बांधकाम मोबदला असा लाभ महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांनी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस द्यावा.

४) सदर प्रकल्प महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) केंद्र शासनाद्वारे विहित केलेल्या कालावधीत पुर्ण करावा.

५) या आदेशाच्या अनुषंगाने, आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका व अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांनी तातडीने आवश्यक कार्यवाही सुरु करावी. व याबाबत वारंवार विभागास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२३०९१५१३०३१२०४२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2023.09.15 13:05:39 +05'30'

**( विद्या हम्पय्या )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत- तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता-**

१) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित)

२) आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका

३) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अभियान संचालक/ प्र.आ.यो महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई

**प्रति-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह, विधि व न्याय), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (नवि-१/नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन, नवी मुंबई.
७) जिल्हाधिकारी, ठाणे
८) निवडनस्ती नवि-१७